जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली
आस्थापना शाखा
विजयनगर, सांगली, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४१५
दूरध्वनी क्र - ०२३३- २६००१८५ Email ID : est.sangli@gmail.com

क्रमांक - मह.कार्या-१/आस्था-२/आरआर-६२/२०२४. दिनांक - २५.०१.२०२४

प्रति,

[redacted]

विषय - तलाठी भरती -२०२३ अनुषंगाने भरतीसंदर्भात निवडयादीतील उमेदवार यांचे मूळ कागदपत्रे तपासणी बाबत..

संदर्भ - मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख पुणे, यांचे कार्यालयामार्फत प्रसिध्द करणेत आलेली जाहिरात क्र.तलाठी भरती/प्र.क्र./४५/२०२३ दिनांक २६.०६.२०२३

२. उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख पुणे, यांचे कार्यालया मार्फत तलाठी गट क पदाकरीता प्रसिध्द करणेत आलेल्या संदर्भीय जाहिरातीच्या अनुषंगाने सांगली जिल्हयातील तलाठी पदाकरीता दिनांक १७ ऑगस्ट २०२३ ते १४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत ऑनलाईन परिक्षा घेण्यात आलेली असून मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून उमेदवारांना मिळालेल्या गुणांची माहिती प्राप्त झालेली असून त्याआधारे प्रवर्गनिहाय उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्यात आलेली आहे. सदर निवडयादीमधील उमेदवारांनी त्यांच्या कागदपत्रांचे पडताळणीसाठी खालील तक्त्या मध्ये नमूद केलेल्या दिवशी व वेळी मूळ कागदपत्रांसह व त्यांच्या दोन स्व साक्षांकित प्रतीसह समक्ष <u>जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली विजयनगर, सांगली, ता. मिरज, जि. सांगली ४१६४१५</u> येथे उपस्थित रहावे.

| अ.क्र. | कागदपत्र तपासणीचे ठिकाण | दिनांक | वेळ | उपस्थित रहावयाचे उमेदवार |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा नियोजन समिती सभागृह जिल्हाधिकारी कार्यालय सांगली विजयनगर, सांगली, ता. मिरज, जि. सांगली ४१६४१५ | ०५.०२.२०२४ | स.११:०० वाजता | निवड यादीत स्थान मिळालेले उमेदवार (१०८) |
| | | ०६.०२.२०२४ | स.११:०० वाजता | प्रतिक्षा यादीत स्थान मिळालेले उमेदवार (११३) |

<u>कागदपत्र पडताळणीस येताना घेवून यावयाच्या कागदपत्रांची यादी,</u>

१. संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या मूळ अर्जाची प्रिंट-आऊट वसेच परिक्षा फी जमा केल्याचा पुरावा.
२. तलाठी पदासाठी अर्ज केलेला उमेदवार हा महाराष्ट्र राज्यांचा रहिवासी असावा त्यासाठी आवश्यक पुरावे पुढील प्रमाणे (महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यात जन्म झालेबाबत अ) महाराष्ट्र राज्यात जन्म झाल्याची नोंद असलेला जन्म दाखला ब) महाराष्ट्र राज्यात जन्म झाल्याची नोंद असलेला शाळा सोडल्याचा दाखला
३. अर्जातील नावाचा पुरावा (एस.एस.सी अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता)

दि.१९/०३/२००३ नुसार संगणक अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून २ (दोन) वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील.

इ) मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

ई) माध्यमिक शालांत परीक्षेत मराठी विषयाचा समावेश नसल्यास, निवड झालेल्या उमेदवारांनी एतददेशीय मंडळाची मराठी/ हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

उ) शाळा सोडल्याच्या दाखल्याची (LC/TC) प्रत

३. आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांनी सक्षम प्राधिका-याने दिलेले जात प्रमाणपत्र (Caste Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र (Validity Certificate) सादर करणे आवश्यक आहे.

४. जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग कवीसीसी २०१६/प्रक्र.१०६४/२०११/१६-ब-दि१२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार, याचिका क्र. २९३६/२०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. २५/८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधीन राहून तात्पुरता नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ०६ महिन्यांच्या आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा अशा उमेदवाराची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रदद करण्यात येईल.

५. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवारांकरीता महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन, विभाग शासन निर्णय क्रः राआधो- ४०९१/प्रक्र३१/१६ अ दि१२ फेब्रुवारी, २०१९ व दि ३१ मे २०२१ अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.

६. नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र असण्याची अट अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गांमधील आरक्षणा करिता लागू राहील.

७. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य असलेल्या उमेदवारांनी महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन, विभाग शासन निर्णय क्रमांक प्रानिमं१२२२/प्र.क्र.५४/का/३-अ दिनांक ०४ में २०२२ मधील परिच्छेद ०९ अन्वये सूचित करणेत आल्या नुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने शेतकऱ्यांच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असलेबाबतची कागदपत्रे सादर करणे आवश्यक असेल.

८. महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास, त्यांनी अर्जासोबत न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे, तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. महिआ २०२३/प्र.क्र.१२३/कार्या-२ दि ४ में २०२३ अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदाकरिताच्या निवडीकरिता नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची अट रद्द करणेत आलेली आहे तसेच; अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या-त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

९. पदवीधर अंशकालीन कर्मचारी यांच्याकरिताच्या आरक्षणासाठी दावा करणा-या उमेदवाराने महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन, विभाग शासन निर्णय, क्र.प अंक, १००९/प्र.क्र.२००/२००९/१६-अ. दि.२७.१०.२००९ व क्र.अंशका- १९१३/ प्र.क्र.५७/२०१३/१६-अ, दि.१९/९/२०१३ नुसार शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले असावे, तसेच सदरच्या अनुभवाची रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये नोंद केलेली असावी. पदवीधर अंशकालीन पदासाठी निवड झालेल्या उमेदवाराने अनुभवाबावत सेवायोजन कार्यालयाकडील मूळ प्रमाणपत्र व सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील,

१०. माजी सैनिक आरक्षण- गुणवत्ता यादीमध्ये येणा-या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक वोर्डात नावनोंदणी केली असल्यास मूळ प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क. आरटीए- १०८२/३५०२/सीआर-

१००/१६-अ दि. २ सप्टेंबर १९८३ नुसार निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवाराच्या कागदपत्रांची सक्षम अधिका-याकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार नाही.

अ) माजी सैनिकांसाठी आरक्षित असलेल्या पदावर भरती करताना युध्द काळात किंवा युध्द नसताना सैन्यातील सेवेमुळे दिव्यांगत्व आले असल्यास, असा माजी सेनिक १५% राखीव पदांपैकी उपलब्ध पदांवर प्राधान्य क्रमाने नियुक्ती देण्यास पात्र राहील.

आ) युध्द काळात किंवा युध्द नसताना सैनिकी सेवेत मृत झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकाच्या कुटुंबातील फक्त एक व्यक्ती, १५ टक्के आरक्षित पदांपैकी "अ" नंतरच्या उपलब्ध पदावर नियुक्तीस पात्र राहील, तथापि, सदर उमेदवाराने तलाठी पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे.

११. परिक्षेकरीता अर्ज सादर केलेल्या खेळाडू उमेदवारांनी विहीत अर्हता धारण करीत असल्याबावत सक्षम प्राधिका-यानें प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत तसेच खेळाडू कोणत्या संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीचा सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेला प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबावतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवगांतील खेळाडूसाठी आरक्षित पदावर शिफारस / नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

१२. प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षण:- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एईएम-१०८०/३१५/१६-अ दिनांक २० जानेवारी १९८० तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी नमूद करण्यात येणा-या आदेशानुसार प्रकल्पग्रस्तांसाठीचे आरक्षण राहील. गुणवता यादीमध्ये येणा-या प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम अधिकारी यांचेकडील प्रकल्पग्रस्त असलेबाबतचे शासकीय नोकरी मिळणेसाठी विहीत केलेले मूळ प्रमाणपत्र / कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील. लेखी परीक्षेत निवड झालेल्या प्रकल्पग्रस्त उमेदवाराचे मूळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणा-या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करुन घेतले जाईल, सदर पडताळणी अंती प्राप्त होणा-या अहवालाच्या आधारे सदर प्रवर्गातील उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

१३. कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा (सामाजिक अथवा समांतर) अथवा सोयी सवलतींचा दावा करणा-या उमेदवाराकडे संबंधित कायदा / नियम / आदेशानुसार विहीत नमुन्यातील प्रस्तुत जाहिरातीस अनुसरून अर्ज स्विकारण्यासाठी विहीत केलेल्या दिनांकापूर्वीचे वैध प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीचे वेळी उपलब्ध असणे अनिवार्य आहे.

१४. दिव्यांग व्यक्तीसाठी असलेल्या वयोमर्यादेचा अथवा इतर कोणत्याही प्रकारचा फायदा घेऊ इच्छिणा-या उमेदवारांनी शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१८ प्र.क्र. ४६/ आरोग्य ६ दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambuncand.gov.in अथवा SADM संगणकीय प्रणालीद्वारे वितरित करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१५. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र) नियम, २००५ मधील तरतुदीनुसार गट अ ते ड मधील पदांच्या सेवा प्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील,

१६. उमेदवारास निवडयादीत स्थान मिळाले म्हणजे, किंवा सदरचे कागदपत्रे पडताळणीसाठीचे पत्र प्राप्त झाले म्हणजे, नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

१७. उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीसाठी नेमून दिलेल्या ठिकाणी, दिलेल्या वेळेपूर्वी १/२ तास अगोदर उपस्थित रहावे.

१८. ज्या जिल्हयाच्या निवडसूची मध्ये उमेदवाराची निवड जाहीर करण्यात आली आहे, तोच जिल्हा संबधित उमेदवाराच्या नियुक्तीसाठीचे कार्यक्षेत्र असणार आहे. निवडसूचीतील जे उमेदवार आवश्यक ती पात्रता पूर्ण करतील, त्यांना कागदपत्रे पडताळणीअंती वैदयकीय व चारित्र्य पडताळणी पूर्ण झाल्यानंतर नियुक्तीपत्र देण्यात येईल, नियुक्ती बाबतचे सर्व अधिकार हे संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना असतील.

४. वयाचा पुरावा
५. उच्चतम शैक्षणिक अर्हता इत्यादीचा पुरावा,
६. संगणक अर्हता पुरावा.
७. सामाजिकदृष्ट्या मागासवर्गीय असल्याबाबतचा (जात प्रमाणपत्र, जातपडताळणी प्रमाणपत्र)पुरावा.
८. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक असल्याबाबतचा पुरावा.
९. अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र.
१०. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ज्या कुटुंबास शेतक-यांच्या आत्महत्याप्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असेल त्याबाबतचे कागदपत्र.
११. पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा,
१२. पात्र माजी सैनिक असल्यास पुरावा,
१३. खेळाडू आरक्षणाठी पात्र असल्यास पुरावा
१४. प्रकल्पग्रस्त आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा
१५. अंशकालीन पदवीधर कर्मचारी आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा,
१६. एस.एस.सी. नावात बदल झाल्याचा पुरावा
१७. अराखीव महिला, आर्थिकदृष्ट्या दुर्बल, खेळाडू, दिव्यांग, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, अंशकालीन पदवीधर कर्मचारी इ.प्रमाणे आरक्षणाचा दावा असल्यास अधिवास प्रमाणपत्र
१८. मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा,
१९. लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र
२०. अनुभव प्रमाणपत्र
२१. छायाचित्र ओळख पुरावा (ओळखपत्र/Photo Identity Card) (आधार कार्ड, वाहन परवाना, पॅनकार्ड, राज्य निवडणूक आयोगाचे निवडणूक ओळखपत्र, पारपत्र, राष्टीयकृत बँकेचे खातेपुस्तक) नजिकच्या काळातील पासपोर्ट साईज दोन फोटो
२२. नावातील बदलाबाबत प्रमाणपत्र/शासन राजपत्र (लागू असल्यास) त्याबाबतचा पुरावा.

<u>कागदपत्रे पडताळणीसाठीच्या सर्वसाधारण सूचना</u>

१. तलाठी पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारांसाठी शासन निर्णय क्र. रिपम/प्र. क्र/६६/२०११/४-१०दि.१७ जून २०११ नुसार ज्या उमेदवाराकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificat) उपलब्ध नसेल त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही. सदर उमेदवारांकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या उमेदवाराने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील, परंतु सदर शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या उमेदवाराचा जन्म हा महाराष्ट्र राज्यात झाल्याची नोंद असणे आवश्यक आहे अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही, ज्या उमेदवाराचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला नसेल परंतु महाराष्ट्र राज्यातील रहिवास सलग १५ वर्ष व त्यापेक्षा अधिक कालावधीचा आहे अशा उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificat) आवश्यक राहील..
२. शैक्षणिक अर्हता- जाहिरातीमध्ये नमूद पदांसाठी अर्ज करणेकामी जाहिरात प्रसिध्दीचा दि. २०/०६/२०२३ रोजी उमेदवारांनी पुढील प्रमाणे शैक्षणिक अर्हता पूर्णतः धारण करणे आवश्यक आहे.

अ) महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांचेकडील दि१ जुलै २०१० च्या अधिसूचनेनुसार उमेदवारकोणत्याही शासन मान्यता प्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा.

आ) महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि) विभाग शासन निर्णय क्र.मातंस-२०१२/प्र.क्र २७७/३९, दि. ४/२/२०१३ मध्ये नमूद केल्यानुसार संगणक / माहिती तंत्रज्ञान विषयक परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे, नसल्यास शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रशिक्षण २००० प्रक्र.६१/२००१

१९. निवड यादीतील पात्र उमेदवारांनी सादर केलेल्या विविध प्रमाणपत्राच्या साक्षांकीत प्रती मूळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्रे तपासणीवेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्राच्या दोन स्व साक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्राच्या आधारे कागदपत्र तपासण्याच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील, त्यामधील प्रमाणपत्र खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरवण्यात येईल.

२०. नावातील बदलाबाबत प्रमाणपत्र/शासन राजपत्र (लागू असल्यास) संदर्भात विवाहीत महिलांनी त्यांच्या विवाहानंतर नावात बदल झाल्याबाबतचे शासन राजपत्र अथवा विवाहापूर्वीचे नांव व विवाहानंतरचे नांवाबाबत रु.१००/- च्या बाँड पेपरवर दोन्ही नावाची व्यक्ती एकच असल्याबाबत केलेले प्रतिज्ञापत्र तसेच विवाह दाखला सोबत आणणे आवश्यक आहे.

२१. ज्यावेळी एखादया राखीव प्रवर्गातील उमेदवाराची प्रतिक्षा यादीमधून निवड करण्याची वेळ येईल,त्यावेळेस संबंधित प्रवर्गाचा उमेदवार खुल्या प्रवर्गातील प्रतिक्षा यादीमध्ये उपलब्ध असलेस प्रतिक्षा यादीमधून नियुक्ती देणेकामी खुल्या प्रवर्गाच्या प्रतिक्षा यादीतील संबंधित राखीव प्रवर्गाच्या उमेदवाराचा प्रथम प्राधान्याने विचार करणेत येईल. म्हणजेच संबंधित प्रवर्गातील जास्त गुणांक धारण करणा-या उमेदवाराचा नियुक्ती कामी प्रथम विचार करणेत येईल.

२२. उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी झालेनंतर, उमेदवार यांनी जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व निकषांची पूर्तता न केलेस तसेच शासन निर्णयातील तरतुदीनुसार कागदपत्रांची पूर्तता केली न केल्यास निवड/प्रतिक्षा सूची मधील सदर उमेदवार अपात्र होईल व नंतर संबधित प्रवर्गाच्या यादीमधील पुढील जास्त गुणांक धारण करणा-या उमेदवाराचा निवड कामी विचार करणेत येईल.

जिल्हाधिकारी, सांगली
जिल्हा-सांगली.

(श्रीमती ज्योती पाटील)
निवासी उपजिल्हाधिकारी तथा
सदस्य सचिव जिल्हा निवड
समिती, सांगली